साम्राज्यवाद

(Imperialism)

प्रस्ताविक :

अनादिकाळापासून एका मानवाला आपले दुसऱ्यावर वर्चस्व असावे असे वाटते. त्यासाठी मानवाने मानवासी संघर्ष केलेला आहे. तसेच एका मानवी समूहाचे दुसऱ्या मानवी समूहावर वर्चस्व असावे, यासाठीच एका मानवी समूहाने दुसऱ्यावर आक्रमणे केल्याची अनेक उदाहरणे इतिहासात आहेत. राज्ये किंवा राष्ट्रे ही मानव निर्मित असल्याने माणसात असलेल्या सर्व गुणदोषांची छाया राज्य किंवा राष्ट्रावर पडलेली दिसते. म्हणूनच एका देषाला दुसऱ्या देषावर वर्चस्व प्रास्तापित करण्याची महत्वकांक्षा दिसून येते. यामुळे अनेक साम्राज्य उदयास आलेली दिसून येतात. उदा. रोमन साम्राज्य, तुर्की साम्राज्यण प्रचीन भारतातील मौर्य, गुप्त साम्राज्ये, इ. अनेक.

साम्राज्यवाद : एक देश, एक वंश, एक भाषा, एक धर्म या लोकांनी दुसऱ्या देशावर राजकीय वर्चस्व निर्माण करणे, यालाच साम्राज्यवाद म्हणतात.

नवीन साम्राज्यवाद : एका देशाने दुसऱ्या देशावर वर्चस्व निर्माण केल्यास वर्चस्वीत देशातील कच्चामाल, साधनसंपत्ती तसचे, सर्व आर्थिक बाबींचा उपयोग वर्चस्व निर्माण करणारा देश आपल्या देशाच्या प्रगतीसाठी करुन घेतो. आर्थिक वर्चस्व निर्माण करतो. यालाच नवीन आर्थिक साम्राज्यवाद असे म्हणतात.

नवीन आर्थिक साम्राज्यवादाला सुरुवात 1870 पासून झाली. म्हणजे औद्योगिक क्रांतीनंतर साम्राज्यवदाचा उदय झाला. म्हणूनच साम्राज्यवादाला औद्योगिक क्रांतीचे अपत्य म्हणतात. त्यांच्या उदयासाठी अनेक कारणे कारणीभूत ठरली.

साम्राज्यवादाची कारणे :

(1) औद्योगिकीकरण क्रांती : औद्योगिक क्रांतीमुळे संपूर्ण युरोपचे औद्योगिकीकरण झाले. कारखानदारी मोठ्या प्रमाणांत पक्क्या मालाचे उत्पादन होऊ लागले. तो माल

देशातल्या देशात विकणे अशक्य झाले. जास्त उत्पादनामुळे कच्च्या मालाचा खप वाढला. हा माल मिळविण्यासाठी तसेच, पक्क्या मालांच्या विक्रीसाठी हुकमी बाजार पेठांची गरज युरोपिय राष्ट्रांना वाटू लागली. म्हणूनच त्यांनी नवनवीन प्रदेशात वसाहती स्थापन करण्यास सुरुवात केली. वसाहती स्थापन करण्याची स्पर्धा युरोपिय देशात सुरु झाली. त्यामुळेच साम्राज्यवादाला चालना मिळाली.

साम्राज्यवादाची कारणे :

1. **औद्योगिकीकरण क्रांती**
2. **भौगोलिक शोध**
3. **नैसर्गिक संपत्तीचे आकर्षण**
4. **भांडवलशाहीचा उदय**
5. **वाढत्या लोक संख्येचा प्रश्न**
6. **राजकिय वर्चस्वाची महत्वाकांक्षा**
7. **नवोदित राष्ट्राची भुमीका**
8. **धर्मप्रसाराचा शोध**
9. **दळणवळण साधनात प्रगती**
10. **ॲफ्रोआशियायी राष्ट्रांचे दौर्बल्य**

(२) भौगोलिक शोध : धाडसी पर्यटक व खलाश्यांनी नवनवीन भूप्रदेश शोधून काढण्याचा सपाटा सुरु केला. त्यामुळे अनेक नवनवीन प्रदेशांची लोकांना माहिती मिळाली. अशा अप्रगत नवनवीन प्रदेशात वर्चस्व निर्माण करण्यासाठी युरोपियन राष्ट्रांनी मोहिम सुरु केली. त्या काळात असा कायदाही पास करण्यात आला की, जो देश एखाद्या प्रदेशाचा शोध लावील, त्या प्रदेशावर त्यांचेच वर्चस्व मान्य करण्यांत येईल. म्हणून नवनवीन प्रदेश शोधने, तेथे वसाहती स्थापन करुन, आपल्या देशाच्या वैभवात प्रादेशिक भर घालणे. हे काम जोरात सुरु झाले. त्यासाठी स्पर्धा सुरु झाली. म्हणूनच साम्राज्यवादाचा उदय झाला.

(३) नैसर्गिक संपत्तीचे आकर्षण : आशिया आणि आफ्रिका हे खंड विस्तृत होते. ॲफ्रो आशियायी देशांचे औद्योगिककरण झालेले नव्हते. त्या ठिकाणी विपुल साधन संपत्तीचे साठे वापराविना पडुन होते. सोने, चांदी, हिरे, कोळसा, तेल यांची कमतरता नव्हती. त्यामुळे या भागात वसाहती स्थापन करुन आपले वर्चस्व निर्माण करावे आणि तेथील संपत्तीवर आपला मालकी हक्क निर्माण करावा, त्या संपत्तीचा उपयोग आपल्या देशाच्या प्रगतीसाठी करुन घ्यावा. असे युरोपीय राष्ट्रांना वाटू लागले. त्यामुळे साम्राज्य वादाला चालना मिळाली.

(४) भांडवलशाहीचा उदय : औद्योगिक क्रांतीमुळे उद्योग व व्यापारात वृध्दी झाली. मोठ्या प्रमाणात उद्योजक व्यापाऱ्यांना नफा मिळू लागला. त्यामुळे भांडवलदारांचा नवीन वर्ग उदयास आला. त्यांचे समाज व राजकारणावर वर्चस्व होते. त्यांच्या जोरावर त्यांनी आपल्याकडील भांडवल अप्रगत देषात विविध प्रकारच्या उद्योग धंद्यात गुंतविण्याचा प्रयत्न केला. म्हणुन अप्रगत देशात वसाहती, स्थापन करण्यास सुरुवात केली. चहा, रबर, निळ, ताग, ज्युट, कापुस, तंबाखु, इत्यादी प्रकारची नगदी पिके घेण्यासाठी मळयांची शेती सुरु केली. त्यावर आधारित वेगवेगळे कारखाने उघडण्यास सुरुवात केली. त्यामुळेच वसाहती वाढू लागल्या परिणामी त्याचे रुपांतर साम्राज्यवादात झाले.

(5) वाढत्या लोक संख्येचा प्रश्न : औद्योगिक क्रांतीमुळे लोकांचे जिवन सुखी व समृद्ध बनले, तसेच, वैद्यकिय क्षेत्रातील प्रगतीमुळे भयंकर, प्रलंयकारी साथीच्या रोगांवर इलाज करणारी हुकमी औषधी तयार केली जाऊ लागली. त्यामुळे मृत्युदर घटला. लोकसंख्येत वाढ झाली. आकारमान व विस्ताराने लहान असलेल्या युरोपियन देशांना वाढती लोकसंख्या एक समस्या बनली. ही समस्या सोडविण्यासाठी अतिरिक्त लोकांचे इतरत्र स्थलांतर करणे गरजेचे होते. त्यासाठी अधिकाधिक प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली असणे आवश्यक होते. या गरजेतुन भुप्रदेशावर वर्चस्व निर्माण करण्याची स्पर्धा सरु झाली. त्यामुळेच साम्राज्यवादाचा उदय झाला.

(6) राजकिय वर्चस्वाची महत्वाकांक्षा : इतरांवार वर्चस्व गाजविण्याची जी मानवी प्रवृत्ती होती. त्यात यत्किंचीतही बदल झालेला नव्हता. आधुनिक काळात तर इतरांवर राजकिय वर्चस्व निर्माण करण्याची स्पर्धाच सुरु झाली होती. कारण इतरांवर वर्चस्व निर्माण करणे, ही बाब प्रतिष्ठेची मानली जात आहे. एखाद्या राष्ट्राच्या वर्चस्वाखाली जितका अधिकाधिक भूभाग असेल तो देश तितकाच सामार्थ्यशाली, वैभवशाली व साम्राज्यशाली मानला जात असे. आपणही अप्रगत देशातील जास्तीत जास्त भूप्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण करुन देषाचे वैभव व प्रतिष्ठेत भर घालावी असे अनेक युरोपियन राष्ट्रांना वाटू लागले. त्यासाठी त्यांच्यात स्पर्धा सुरु झाली ही स्पर्धाच साम्राज्यवादाला कारणीभूत ठरली.

(7) नवोदित राष्ट्राची भुमीका : अमेरिकन व फ्रेंच राज्य क्रांती यांच्यापासून प्रेरणा घेत युरोपात राष्ट्रवादी चळवळी सुरु झाल्या. त्यामुळे 19 व्या शतकात युरोपात इटली, जर्मनी यांच्या सारखी नवीन राष्ट्रे उदयास आली. वसाहती मिळवणे. साम्राज्यविस्तार करणे, हे प्रतिष्ठेचे मानली जात असल्याने नवोदित राष्ट्रात साम्राज्य तृष्णा निर्माण झाली. आपले ही प्रचंड विस्तृत साम्राजय असावे. जगाच्या वाटणीत आपल्याला हिस्सा मिळावा असे त्यांना वाटू लागले. म्हणूनच वसाहती मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले. त्यामुळे साम्राज्यवादाचा जन्म झाला.

(8) धर्मप्रसाराचा शोध : धर्म सुधारणा चळवळीमुळे आपल्या धर्माचा प्रसार करणे, येशुचा संदेश रानटी मागासलेल्या लोकांपर्यंत पोहोचविणे हे आपले कर्तव्य आहे, असे प्रत्येक युरोपियन नागरिकांना वाटत होते. त्यात ॲफ्रोआशियायी देशाकडे जाणारे मार्ग सापडल्यामुळे हे देश म्हणजे ख्रिश्चन धर्माच्या प्रचार व प्रसारासाठी अनुकूल क्षेत्र आहे असे धर्मोपदेशकांना वाटू लागले. अशा अप्रगत देशात आपल्या धर्माचा व संस्कृतीचा प्रसार करणे ख्रिश्चन धर्माचे अनुयायी वाढविणे यासाठी युरोपियन देष प्रयत्न करु लागले. अप्रगत देशात वसाहती स्थापन करुन साम्राज्य विस्तारास हातभार लावण्याचे कार्य धर्मप्रसाराने केले.

(9) दळणवळण साधनात प्रगती : अद्योगिक क्रांतीमुळे वैज्ञानिक प्रगतीची घोडदौड सुरु झाली. नवनवीन यंत्रतंत्राचा उपयोग दळणवळण क्षेत्रात केला जाऊ लागला. त्यामुळे आगबोटी, रेल्वे, तारा यंत्रे, टेलीफोन, इत्यादी दळणवळणाची साधने अस्तित्वात

आली. दुर दुरच्या देशा जाणे व ते देश जिंकणे, त्यांच्यावर वर्चस्व निर्माण करणे इत्यादी गोष्टी सहज शक्य झाल्या. त्यामुळे अनेक प्रगत युरोपियन देशांनी अप्रगत ॲफ्रोआशियायी राष्ट्रांकडे धाव घेऊन त्यांच्यावर वर्चस्व निर्माण करण्याचा सपाटा सुरु केला. त्यातुनच साम्राज्यवादाचा उदय झाला.

(10) ॲफ्रोआशियायी राष्ट्रांचे दौर्बल्य : प्रबोधन चळवळीमुळे युरोपियन देशांची वैचारिक जागृती झाली. त्यांनी बुध्दीप्रमाणवादाच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात प्रयोग व संशोधनाच्या आधारे वैज्ञानिक प्रगती साधली त्यांच्या जोरावार औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरु केली. त्यामुळे औद्योगिक क्रांती झाली. या क्रांतीमुळे युरोपियन देशांची सर्वांगीण प्रगती झाली. तर या उलट ॲफ्रोआशियायी राष्ट्रे आपला धर्म आपली संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे, असे समजून बदलत्या काळाबरोबर बदलत जाण्याऐवजी अज्ञानरुपी साखर झोपेत गाढ झोपी गेले होते. हया मागासपणामुळेच ते प्रगतराष्ट्रांसमोर दुर्बल वाटू लागले. प्रगत राष्ट्रांनी त्यांच्यावर सहजासहजी वर्चस्वी निर्माण केले. परिणामी ॲफ्रोआशियायी राष्ट्रांचे दौर्बल्य साम्राज्यवादासाठी कारणीभूत ठरले.

साम्राज्यवादाचे स्वरुप : इ.स. 1870 च्या सुमारास साम्राज्यवादाचा उदय झाला. इ. स. 1914 पर्यंत साम्राज्यवादाचा प्रभाव होता. युरोपातील प्रगत राष्ट्रांनी संपुर्ण जगाची वाटणी आपापसात करुन घेतली. जुन्या साम्राज्यवादा पेक्षा नवीन साम्राज्यवाद अधिक तिव्र होता. दिवसेंदिवस तो अधिकाधिक सुक्ष्म होत गेला. हया स्पर्धेत युरोपिय राष्ट्रांप्रमाणेच अमेरिका व जपान यांनी भाग घेतला. आफ्रिका आणि आशिया खंडाचे साम्राज्यवादामुळे विभाजन झाले. या खंडात साम्राज्यवादाचे स्वरुप पुढील प्रमाणे होते.

आफ्रिका खंड : हे खंड अज्ञात खंड म्हणून ओळखले जात हो. घनदाट अरण्य, विस्तीर्ण सरोवरे, प्रचंड वाळवंटी प्रदेश त्यामुळे या भागांविषयी फारशी माहिती नव्हती. वास्को–द–गामाच्या जलपर्यटनामुळे आफ्रिका खंडाच्या विस्ताराची युरोपिय लोकांना माहिती झाली. नंतरच्या काळात धाडशी प्रवाशांनी, खलाश्यांनी आफ्रिका खंडाच्या अज्ञात भुभागावर अनेक सफरी केल्या. मंगोपार्क, कॅप्टन स्पेक व सर सॅम्युएल बेकर हयांनी आफ्रिका खंडाच्या अज्ञात भुभागावर अनेक सफारी केल्या. कॅप्टन स्पेक व सर सॅम्युएल बेकर हयांनी आफ्रिका खंडाच्या दाट जंगलात शिरुन नवनवीन सरोवरे शोधुन काढली. स्कॉटीस मिशनरी डेव्हिड लिव्हिंगस्टन यांनी आफ्रिकेचा मध्यभाग व

झांबेझी नदी यांचा शोध घेतला. मंगोपार्क नायगर नदीचा शोध घेतला. हया प्रवाशांनी प्रवास वर्णने लिहीली. त्यामुळे इतरांना आफ्रिकेची माहिती मिळाली. हेन्री स्टॅनले यांनी Through The Dark Continent हे प्रवास वर्णन लिहिले. त्यामुळे आफ्रिकेतील सोने, चांदी, हिरे, कोळसा, इत्यादी मौल्यवान संपत्तीच्या विषयी माहिती मिळाली म्हणूनच आफ्रिका खंडातील भुभागावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी युरोपिय राष्ट्रांची स्पर्धा सुरु झाली. अल्पावधीतच त्यांनी आफ्रिका खंड वाटून घेतला. आफ्रिका खंडात युरोपिय देशांच्या वसाहती देशानुक्रमे पुढील प्रमाणे होत्या.

<u>बेल्जियम</u> : बेल्जियम आफ्रिकामध्ये वसाहत स्थापन करण्याचा पहिला मान मिळवला. कारण बेल्जियमचा राजा दुसरा लिपोल्ड याने इ.स.1876 मध्ये भुगोल तज्ज्ञांची परिषद भरविली होती. त्यांना आफ्रिकेच्या अंतर्गत भागाचे संशोधन करण्याचे आवाहन केले. त्यासाठी त्यांना मदत देऊ केली. हेन्री स्टॅलने मार्फत कांगो खोऱ्याची राजाने तपशीलवार माहिती घेऊन त्याच्या आधारे कांगो फ्रि स्टेट येथे बेल्जियमने वसाहत स्थापन केली.

<u>इंग्लंड</u> : इंग्लंड त्याकाळात जगात नंबर एकची सत्ता होती. म्हणूनच इंग्लंडच्या सर्वात जास्त वसाहती होत्या. आफ्रिकेत इंग्लंडने डच लोकांषी संघर्ष करुन त्यांचा पराजय केला. डच– इंग्लंड यांच्यात वासहतीच्या प्रश्नावरुन झालेल्या युध्दास बोअर युध्द म्हणतात. बोअर युध्दाचा कालावधी 1899 ते 1902 असा होता. केप ऑफ गुड होप येथे इंग्रजांची पहिली वसाहत स्थापन झाली. त्यानंतर त्यांनी नाताळ, ट्रान्सवाल, ऑरेंज या चार राज्यांचा दक्षिण ऑफ्रिका संघ स्थापन केला. पुढील काळात आफ्रिकेच्या उत्तर टोकावर असलेल्या, इजिप्तच्या इस्माईलपाशा याच्याकडुन सुएझ कालव्याचे शेअर्स विकत घेऊन इजिप्तवर वर्चस्व निर्माण केले. या खेरीज सुदान, युगांडा, गॅबिया बेच्युलॅड, ऱ्होडेशिया, नायजेरिया गोल्ड कास्ट इ. ठिकाणी इंग्लंडच्या वसाहती आफ्रिकेत होत्या.

<u>फ्रांस</u> : फ्रान्स हे राष्ट्र त्या काळात नंबर दोनचे राष्ट्र होते. त्यामुळे फ्रान्सच्या आफ्रिकेत इंग्लंड खालोखाल वसाहती होत्या. 1824 ते 1914 पर्यंत आफ्रिकेत 35 लक्ष चौरस मैल प्रदेशावर वर्चस्व होते. त्यात साहरा वाळवंट, सेनिगल, आयव्हरी कोस्ट, कांगो लगतचा भाग मादाकास्कर, ट्युनिशिया मोरोक्को, इत्यादी प्रदेशावर वर्चस्व निर्माण करुन तेथे वसाहती स्थापन केल्या.

<u>पोर्तुगाल</u> : पोर्तुगालने आफ्रिकेत बेल्जियम व कांगोच्या दक्षिणेस असलेल्या अंगोला प्रान्तावर वर्चस्व निर्माण केले. तसेच, मोझांबीक येथेही पोर्तुगालची वसाहत होती.

स्पेन : आफ्रिका खंडाच्या विभागणीत सहभागी होऊन स्पेन ने या भागात वसाहती स्थापन करण्यात थोडे बहुत यश मिळवले. स्पेनच्या गिनी कोस्ट मधील बेटावर मोरोक्कोच्या थोड्याशा भागावर तसेच, रिओ–डी–कोरे, इत्यादी ठिकाणी वसाहती होत्या.

इटली : इटलीचा युरोपच्या राजकारणात उशिरा उदय झाला. त्यामुळे तो उशिराने साम्राज्यवादी स्पर्धेत सहभागी झाला. तरीही इटलीने इरीट्रिया, सामोली लॅंड तसेच तुर्कस्थानशी युध्द करुन ट्रीपोली, यायरेनिका, इत्यादी भुभागावर इटलीचे वर्चस्व निर्माण झाले होते. त्या ठिकाणी इटलीच्या वसाहती होत्या.

जर्मनी : इटली प्रमाणेच जर्मनीचाही उशिरा उदय झालेला होता. प्रारंभी जर्मनी साम्राज्यवादी स्पर्धेपासुन अलिप्त होता. परंतु कैसर विल्यम दुसरा हा सत्तेवर आल्यावर जर्मनीने या स्पर्धेत भाग घेतला कारण कैसर विल्यम (।।) हा साम्राज्यवादी मनोवृत्तीचा होता. त्यामुळे जर्मनीने या स्पर्धेत भाग घेऊन आफ्रिकेत वसाहती स्थापन करण्याचा प्रयत्न केला. प्रथम जर्मन व्यापारी ब्रिमेन याने वायव्य आफ्रिका येथे वसाहत स्थापन केली. जर्मनीने त्यानंतर आफ्रिका, कामेरुन, टोगोलॅंड, पुर्व आफ्रिकेत झांझीवार, इत्यादी ठिकाणावर वर्चस्व निर्माण करुन वसाहती स्थापन केल्या.

आशिया खंडातील साम्राज्यवाद : संपुर्ण आफ्रिका खंडावर साम्राज्यवाद्यांनी वर्चस्व निर्माण केल्यानंतर आपला मोर्चा आशिया खंडाकडे वळवला. अल्पावधीतच संपुर्ण आशिया खंडावर साम्राज्यवाद्यांचे वर्चस्व निर्माण झाले. आशिया खंडातील पाश्चात्य देशांच्या वसाहती देशानुक्रमे पुढील प्रमाणे होत्या.

इंग्लंड : इंग्लंड त्या काळातील सर्वात सामर्थ्यवान राष्ट्र होते. म्हणूनच इंग्लंडच्या जगात विविध ठिकाणी वसाहती होत्या. इंग्लंडने इ. स. 1615 साली हिंदुस्थानात सुरत येथे पहिली व्यापारी वखार स्थापन केली. त्यानंतर मुंबई, मद्रास, कलकत्ता, इत्यादी ठिकाणी भारतात इंग्रजांनी वखारी स्थापन केल्या. इ. स. 1757 च्या प्लॉसीच्या लढाईने हिंदुस्थानात रॉबर्ट क्लाईव्हने इंग्रजी सत्तेचा पाया घातला. इ. स. 1818 पर्यंत त्यांचे संपुर्ण भारतावर वर्चस्व निर्माण झाले. त्यांनतर इंग्रजांनी सिंगापुर, ब्रम्हदेश, मलाया, बोर्निया, आफगाणिस्तान, दक्षिण इराण, चीनमध्ये कॅटन, ॲमोय, शांघाय, फुचौ हॉंगकॉंग इत्यादी ठिकाणी इंग्रजांनी वसाहती स्थापन केल्या.

फ्रान्स : फ्रान्सनेही इंग्लंडच्या खालोखाल आशियायी देशात वसाहती स्थापन केल्या होत्या. फ्रान्सच्या भारतात चंद्रपुर, पॉंडीचेरी, इत्यादी ठिकाणी वसाहती होत्या. तसेच, अन्नाम, कंबोडीया, टोनकीन, कोचीन, इंडो चायना आणि चिनच्या काही भागात फ्रेन्चाच्या वसाहती तोत्या.

रशिया : रशियाच्या आशिया खंडात इराण, कॉस्पियन समुद्राच्या पुर्वेकडील तुर्की प्रदेशात, मध्य आशियातील ताश्कंद, समरकंद, चीनमध्ये मांचुरीया, कोरीया, इत्यादी ठिकाणी वसाहती होत्या.

अमेरिका : अमेरिकेने जपानमध्ये काही काळ वसाहती स्थापन केल्या. तसेच, फिलीपाईन्स आणि चीनच्या बऱ्याच भूभागावर अमेरिकन वसाहती होत्या. चीनच्या बाबत अमेरिकेने मुक्तद्वार धोरण जाहिर केले होते. इ. स. 1860 साली तो प्रस्ताव साम्राज्यवाद्यांनी मान्य केल्यामुळे चीनमध्ये पाश्चात्य राष्ट्रांना समानतेच्या तत्वावर व्यापारी सवलती मिळाल्या.

जर्मनी : जर्मनीने आशिया खंडात चीनमध्ये किया चौऊ, शाटुंग, इत्यादी ठिकाणी वसाहती स्थापन केल्या.

जपान : मेईजी क्रांतीनंतर जपानचा काया पालट झाला होता. जपान हे प्रगत राष्ट्र बनले होते. जपाननेही विस्तारवादी धोरणाचा अवलंब केला होता. आशिया हा आशियायी लोकांसाठी आहे आणि आशियाचे नेतृत्व जपानकडे आहे. अशी घोषणा जपानने केली आणि साम्राज्य विस्तारासाठी चीनकडे आपला मोर्चा वळवला. इ. स. 1894 – 95 साली चीनवर त्याने आक्रमण केले. चीनचा जपानने पराजय केला. कोरिया, फॉर्मोसा येथे जपानने वसाहती स्थापन केल्या. पुढील काळात विस्तारवादासाठी जपानने चीनवर लक्ष केंद्रीत केले. मांचुरिया आणि इतर चीनी भुप्रदेशावर आपल्या वसाहती स्थापन केल्या. स्पेन, पोर्तुगाल सारख्या देशांच्याही आशियात वसाहती होत्या. अशा प्रकार पाश्चात्य राष्ट्रांनी दुर्बल आशियायी देशांची प्रादेशिक लचके तोडत आपले वर्चस्व आशियायी राष्ट्रांवर निर्माण केले.

साम्राज्यवादाचे परिणाम : औद्योगिक क्रांतीमुळे इ. स. 1870 साली साम्राज्यवादाचा उदय झाला. 1914 पर्यंत प्रगत युरोपियन देशांनी दुर्बल ॲफ्रोआषियायी देशात चढाओढीने वसाहती स्थापन करुन या देशांची आपआपसात वाटणी करुन घेतली. या साम्राज्यवादाचे अनेक चांगले वाईट परिणाम झाले ते आपणांस पुढील प्रमाणे सांगता येतील.

(1) ॲफ्रोआशियायी राष्ट्रे पारतंत्र्यात गेली : औद्योगिक क्रांतीने संपुर्ण युरोपचे औद्योगिकीकरण झाले. कारखानदारी वाढली. उत्पादन वाढले. कच्चा मालाचा खप वाढला. त्यामुळे कारखानदारांना कच्चा मालाची उणीव भासू लागली. तसेच, पक्क्या मालाच्या विक्रीसाठी हुकमी बाजारपेठांची गरज वाटु लागली. ही गरज भागविण्यासाठी त्यांनी अप्रगत ॲफ्रोआशियायी राष्ट्रांकडे धाव घेतली. या देशातील जास्तीत जास्त भुभागावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी पाश्चात्य देशांनी युध्द पातळीवर प्रयत्न सुरु केले. त्यांच्यात साम्राज्यवादी स्पर्धा सुरु झाली. त्याचा परिणाम म्हणजे त्यांचे ॲफ्रोआशियायी देशावर वर्चस्व निर्माण झाले. साम्राज्यवाद्यांनी वर्चस्वीत देशातील शासनव्यवस्था, अर्थ व्यवस्थेवर आपल्या आर्थिक फायद्यासाठी नियंत्रण प्रस्थापीत केले. त्यामुळे त्यांचे सार्वभौमत्व धोक्यात आले. शेवटी हे देश पारतंत्र्यात गेले.

साम्राज्यवादाचे परिणाम

1. **ॲफ्रो आशियायी राष्ट्रे पारतंत्र्यात गेली**
2. **ॲफ्रो आशियायी देशात आर्थिक दुरावस्था**
3. **पाश्चात्य संस्कृती व कल्पनांचा प्रसार**
4. **भोतिक सुधारणा**
5. **ख्रिश्चन धर्माचा प्रसार झाला**
6. **वसाहतीतील लोकजिवन दरिद्री बनले**
7. **ॲफ्रोआशियात राष्ट्रवादाचा उदय झाला**
8. **गटबाजीच्या राजकारणास सुरुवात झाली**
9. **पहिले जागतिक महायुध्द झाले**

(2) ॲफ्रोआशियायी देशात आर्थिक दुरावस्था : युरोपिय राष्ट्रे व्यापारी वृत्तीची होती ते नेहमी आर्थिक फायद्याचाच विचार करत त्यांनी वर्चस्वीत देशात खुल्या व्यापाराचे तत्व अंमलात आणले. त्यांच्या या धोरणामुळे ॲफ्रोआशियायी देशांचा व्यापार व उद्योग पुर्णपणे बुडाला. या देशातील कच्च्या मालाची उपलब्धी लक्षात घेऊन साम्राज्यवाद्यांनी यावर आधारीत अनेक प्रकारचे उद्योगधंदे सुरु केले. त्यासाठी वर्चस्वीत देशातील लोकांकडुन कच्चा माल स्वस्त दरात विकत घेतला. त्यांच्यावर जाचक कर

लावले. त्यांचे आर्थिक शोषण केले. तेथील लोकांकडुन कमी वेतनात जास्त काम करुन घेतले. वर्चस्वीत देशातील धनसंपत्ती व मुल्यवान वस्तु स्वतःच्या देशात नेल्या. त्यामुळे ॲफ्रोआशियायी देशात आर्थिक दुरावस्था निर्माण झाली.

(3) पाश्चात्य संस्कृती व कल्पनांचा प्रसार : पाश्चिमात्यांचे वर्चस्व निर्माण झाल्यामुळे त्यांचा ऐत देशीय लोकांशी संपर्क वाढला. त्यामुळे पाश्चात्यांची संस्कृती, त्यांच्या विज्ञान व तत्वज्ञान विषयक कल्पना धर्माविषयी कल्पना त्यांचे राजकिय व सामाजिक जिवन, त्या विषयी कल्पना, त्याचे कायदे व न्यायप्रणाली कला व क्रिडा प्रकार त्यांची वेषभुषा, इत्यादी अनेक गोष्टी विषयीचे ज्ञान व माहिती ऐतद्देशीय लोकांना मिळाली. स्वातंत्र्य, समता, बन्धुत्व ही तत्वत्रयी लोकप्रिय झाली. या तत्वाचा त्यांच्या कल्पनांचा व त्यांच्या विविध कल्पनांचा प्रचार व प्रसार सर्वत्र झाला.

(4) भोतिक सुधारणा : पाश्चिमात्यांचे ॲफ्रोआशियायी देशावर वर्चस्व निर्माण झाल्यामुळे या साम्राज्यवादाचा या अप्रगत देशांना अप्रत्यक्ष फायदाही झाला. आपले राज्य टिकविण्यासाठी साम्राज्यवाद्यांनी वसाहतीच्या ठिकाणी अनेक प्रकारच्या भौतिक सुधारणा केल्या. दळणवळणासाठी पक्के रस्ते, रेल्वे, तारायंत्रे, पोस्ट, पुल, इत्यादी सुधारणा केल्या. पाणी पुरवठा करण्यासाठी धरणे, तलाव, कालवे बांधले, उद्योगधंद्यासाठी कारखाने सुरु केले. वैद्यकिय सुविधा निर्माण केल्या. पाश्चात्य धर्तीचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. अप्रत्यक्षरित्या ऐतद्देशिय लोकांना राज्यकारभाराचे शिक्षण देखील मिळाले. थोडक्यात साम्राज्यवादामुळे अप्रगत देशात अनेक प्रकारच्या भौतिक सुधारणा झाल्या.

(5) ख्रिश्चन धर्माचा प्रसार झाला : प्रबोधन चळवळीमुळे धर्मसुधारणा चळवळ सुरु झाली. धर्मास पुर्वीचे शास्त्रशुध्द स्वरुप प्राप्त झाले. अनेक धर्मबाह्य गोष्टींचे उच्चाटन झाले. धर्माचा प्रचार व प्रसार करणे हे पवित्र धार्मिक कार्य मानले जाऊ लागले. त्यामुळे अनेक ख्रिस्तीधर्म प्रसारक मिषनऱ्या स्थापन झाल्या. साम्राज्यवादाच्या स्पर्धेत या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी महत्वाची भुमिका बजावली. त्यांनी अप्रगत देशातील दुर्गम, डोंगराळ भागातील मानव वस्तीत जाऊन त्यांना मानवतावाद व धर्माची शिकवण देत ख्रिश्चन धर्माची शिकवण देत ख्रिश्चन धर्माची दिक्षा देण्याचा सपाटा सुरु केला. हे

काम अनेक ठिकाणी अनेक मिशनरी मार्फत चालू होते. त्यामुळे संपुर्ण ॲफ्रोआशियात खंडात ख्रिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार झाला.

(6) वसाहतीतील लोकजिवन दरिद्री बनले : साम्राज्यवाद्यांनी तिथल्या प्रजेला माणुसकी शून्य रितीने वागवले. स्वस्त मजूर मिळावेत म्हणून काही ठिकाणी गुलामगिरी सारखी अनिष्ठ प्रथा जोपासली. लोकांकडुन कमी वेतनात काम करुन घेतले. त्यांचे पारंपारीक उद्योगधंदे बंद केले. आर्थिक फायद्यासाठी त्यांचा माल स्वस्तात खरेदी करत त्यांचा शेती सारखा व्यवसाय जास्त शेतसारा लादून बंद पाडला. त्यामुळे या लोकांत बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली. उदरनिर्वाहाच्या बाबत भिषण प्रश्न निर्माण झाला. उपासमारीची वेळ आली. ऐतद्देशिय लोकांचे जिवन दुःखी, दरिद्री, कष्टप्रद बनले.

(7) ॲफ्रोआशियात राष्ट्रवादाचा उदय झाला : साम्राज्यवाद्यांच्या वसाहतीमध्ये एक छत्री अंमल सुरु झाला. त्यामुळे तेथील लोकात एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. त्यातच पाश्चात्यांशी त्यांचा दैनंदिन जिवनातसंपर्क वाढला. त्यामुळे त्यांच्या राष्ट्रवादाच्या कल्पना शासन यंत्रणा, लोकशाही, बुध्दिप्रामाण्यवाद, इत्यादी अनेक कल्पनांची माहिती मिळाली. त्या विषयी त्यांना चांगले ज्ञान झाले. स्वातंत्र्य समता, बन्धुत्व, इत्यादी सारख्या कल्पनांमुळे येथील लोकांच्या मनात राष्ट्राविषयी आदर आपुलकी निर्माण झाली. तसेच, स्वतःच्या राष्ट्रासाठी वाटेल तो त्याग करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण झाली. त्यामुळेच ॲफ्रोआशिया खंडात राष्ट्रवादाचा उदय झाला. पुढील काळात राष्ट्रवादी भावना विकसीत होऊन त्यांनी साम्राज्यवाद्यांच्या विरोधात राष्ट्रवादी चळवळी सुरु केल्या.

(8) गटबाजीच्या राजकारणास सुरुवात झाली : साम्राज्य विस्तारास सुरुवात झाल्यानंतर प्रगत युरोपिय राष्ट्रांनी युध्द पातळीवर प्रयत्न करत वसाहती स्थापन करण्याचा सपाटा सुरु केला. त्यांच्यात त्यासाठी स्पर्धाच सुरु झाली. साम्राज्य विस्तार करत असतांना परस्परांचे संबंध परस्परांना अडसर ठरु लागले. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष होऊ लागला. त्यातुन परस्परांच्या विरोधात मित्रांचा शोध सुरु झाला. त्यातून शत्रुचा शत्रु तो आपला मित्र, या राजकिय नितीप्रमाणे मैत्री करार होऊ लागले. यातुनच मित्र राष्ट्रांचे वेगवेगळे गट निर्माण होऊ लागले. उदा. इंग्लंडच्या विरुध्द जर्मनी, फ्रान्स, रशिया गट, 1902 इंग्लंड जपान मैत्री करार, इत्यादी अनेक प्रकारचे मित्रामित्रांचे गट निर्माण झाले. एक दुसऱ्यास शह देण्यासाठी गटबाजीचे राजकारण सुरु झाले.

(9) पहिले जागतिक महायुध्द झाले : 1914 साली झालेले पहिले जागतिक हा साम्राज्यवादाच्या अनेक परिणामांपैकी एक परिणाम आहे. साम्राज्यवादाच्या स्पर्धेमुळे राष्ट्रा – राष्ट्रात वसाहती स्थापन करण्याच्या प्रश्नावरुन संघर्ष होऊ लागला. जागतिक राजकारणात तणाव निर्माण झाला. प्रत्येक राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राच्या ध्येय्य धोरणा विषयी शंका वाटू लागली. एकंदरीत साषंकतेचे राजकारण जागतिक पातळीवर निर्माण झाले. प्रत्येक राष्ट्राला आपल्या सुरक्षितते विषयी चिंता वाटू लागली. त्यातुनच लष्करी सामर्थ्यात वाढ करणे आणि मित्र शोधणे यासाठी जोरदार हालचाली सुरु झाल्या. शेवटी युरोपियन राष्ट्रांचे दोन परस्पर विरुध्द गटात विभाजन झाले. या गटातील मतभेद दिवसेंदिवस अधिकाधिक तिव्र बनत गेले. प्रत्येक प्रश्न युध्दाने सोडविण्याची भाषा सुरु झाली. त्यामुळेच पहिल्या जागतिक महायुध्दासाठी अनुकूल पार्श्वभुमी तयार झाली.

सारांश : साम्राज्यवाद औद्योगिक क्रांतीचे अपत्य आहे. साम्राज्यवादामुळे ॲफ्रोआशिया खंड पारतंत्र्यात गेले. पाश्चात्यांचे वर्चस्व निर्माण झाल्यामुळे या भागात पाश्चात्य संस्कृती, धर्म, राज्यपध्दती, राज्यविषयक कल्पना, तत्वज्ञान व विज्ञान विषयक कल्पनांचा प्रचार व प्रसार झाला. अज्ञानरुपी झोपेत असलेल्या लोकांना साम्राज्यवादाने खडबडुन जागे केले व आत्मपरिक्षण करावयास लावले. त्यामुळे या देशांमध्ये राष्ट्रवादी भावना निर्माण झाली. तिचा विकास झाला. ॲफ्रोआशियायी लोकांनी संघटीत होऊन स्वातंत्र्याचे आंदोलन सुरु केले आणि स्वातंत्र्य मिळवले.

.....